म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८११
१९६०

...च्या समाजकल्याण, शिक्षण, शेतकी, पशुसंवर्धन,
...वाचनालय खात्यांनीं पुरस्कारिलेलें.

# महाराष्ट्रवन्दनम्

राष्ट्रभक्तिर्देवभक्तिर्नित्याचारेषु सत्यता ।
स्त्रीवर्गेषु च पावित्र्यं सदा राष्ट्रविवृद्धये ।।
राष्ट्रभक्ती देवभक्ती नित्याचारांत सत्यता ।
वसे पावित्र्य स्त्रीवर्गीं राष्ट्रासी उंचवी सदा ।।

रचयिता
नारायण वासुदेव तुंगार

१९६०

REFBK-0013476
REFBK-0013476

★

किंमत २५ नवे पैसे



श्री छत्रपति शिवाजी महाराज



लो. टिळक



म. गांधी



पं. जवाहरलाल नेहरू

# निवेदन

( १ ) महाराष्ट्रामधील सर्व पक्षांतल्या व सर्व पंथांतल्या लहान-थोर स्त्री-पुरुषांच्या दीर्घ प्रयत्नामुळें, तपश्चर्येमुळें अनेक वर्षांनंतर दिनांक १ मे १९६० रोजीं मराठी भाषिकांचें " महाराष्ट्र राज्य " स्थापन झालें. या आनंदाच्या प्रसंगीं अनेक ग्रंथकारांनीं व प्रकाशकांनीं महाराष्ट्राचें सर्वांगीण दर्शन समाजाला घडावें म्हणून लहानमोठीं पुस्तकें, पोवाडे, काव्यग्रंथ, समाजाला सादर केले. त्याच स्तुत्य मार्गाचा अवलंब करून मीहि महाराष्ट्रवन्दनम् —नांवाचें मूळ ४२ श्लोकांचें संस्कृत काव्य रचून व त्याचा मराठी पद्यानुवाद, पण्डित, वैद्यभूषण राजारामशास्त्री कवीश्वर, यांच्या मदतीनें करून, जनतारूपी जनार्दनाच्या चरणीं आज समर्पण करीत आहे. या काव्यांतील १ ते १५ श्लोक अनेक हायस्कुलें, ट्रेनिंग कॉलेजें, मराठी प्राथमिक शाळा, यांनीं दररोजच्या प्रार्थनेंत म्हणण्याचा स्तुत्य उपक्रम चालू करून माझ्या सेवेला फार मोठे प्रोत्साहन दिलें याचा मला सात्त्विक अभिमान वाटतो. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्रराज्य दिन, बक्षीससमारंभ, विशेष शुभ प्रसंग, थोरांच्या जयंत्या, या प्रसंगीं अनेक संस्थांनीं वरील १ ते १५ श्लोकांचें पठण चालू केलें आहे. ही गोष्ट नमूद करण्यांत मला फार मोठा आनंद वाटतो. या प्रोत्साहनाबद्दल व श्रीमान् धरमदास प्रभुदासजी मेहता, डेक्कन पेपर मिल, मुंढवा, यांच्या सहाय्याबद्दल मी सर्वांचा आजन्म ऋणी आहे.

( २ ) **विद्वानांचें ऋणः—** ' आपरितोषात् विदुषां न साधु मन्ये प्रयोग-विज्ञानम् ' या उक्तीप्रमाणें आपल्या कृतीला विद्वानांचा संतोष व त्यांचा चांगला अभिप्राय असणें, हेंच खऱ्या प्रयोगसिद्धीचें लक्षण आहे; म्हणून अभिप्राय दिलेल्या विद्वानांच्या संतोषाबद्दल मी त्यांना शतशः धन्यवाद देतों.

( ३ ) **महाराष्ट्रवन्दनम्** नांवाचें सुमारें चारशे ते पांचशे श्लोकांचें मूळ संस्कृत काव्य व त्याचा मराठी पद्यानुवाद ग्रंथ स्वतंत्रपणें छापत आहे. यांत देवता, गिरी, लेणीं, संत, शूर-वीर, यांना वंदन आहे. तसेंच राजकीय, सामाजिक, धार्मिक, कलावंत, उद्योगपति, कवि, नाटककार, ग्रंथकार, प्राच्यभाषा पंडित, कोशकार, वगैरे ज्या अनेक स्त्री-पुरुषांनीं महाराष्ट्राचें वैभव वाढविलें, महाराष्ट्राचें सर्वांगीण नंदनवन केलें व करीत आहेत अशा महान् व्यक्तींचें चरित्र काव्यांत देऊन त्यांना वंदन केलें आहे. यापुढें त्यांची थोर परंपरा महाराष्ट्रांतील भावी तरुण पिढीनें शुद्धपणानें पुढें चालू ठेवावी आणि आपला भारतदेश व महाराष्ट्र यांच्याविषयीं सतत अभिमान धारण करावा, नेहमी एकीनें, नीतीनें वागावें, उद्योगप्रियता अंगीं आणावी, आत्मशुद्धि, कर्मशुद्धि, जनशुद्धि, हस्तें परहस्तें तनमनधनें करून राखावी; मानवताधर्म, मंदिरें, स्त्रिया, या मानबिंदूंचे सदैव रक्षण करावें. यायोगें सर्व भारतांत, सर्व जगांत महाराष्ट्राची कीर्ति गाजवावी. हा हेतु मनांत ठेवून मी हें काव्य रचिलें आहे. तो हेतु सिद्धीस जाईल, अशी मी आशा करतो.

२१ नोव्हेंबर १९६० ९३८०५ **ना. वा. तुंगार.**

# महाराष्ट्रवन्दनम् ।

## भारतवन्दनम् ।

भारतोऽयं विजयतां यावच्चन्द्रदिवाकरौ ।
भारतं च शुभं श्रेष्ठं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ १ ॥

## महाराष्ट्रवन्दनम् ।

महाराष्ट्रं विजयतां यावच्चन्द्रदिवाकरौ ।
महाराष्ट्रं शुभं श्रेष्ठं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ २ ॥

## देववन्दनम् ।

महाराष्ट्रस्य राज्यस्य सदा माङ्गल्यसिद्धये ।
विघ्नहर्तॄन् सदा नौमि ऋद्धिसिद्धिविनायकान् ॥ ३ ॥
महाराष्ट्रस्य राज्यस्य सदा माङ्गल्यसिद्धये ।
माङ्गल्यार्थं महावीरं वन्दे बुद्धं च नानकम् ॥ ४ ॥
महाराष्ट्रस्य राज्यस्य सदा माङ्गल्यसिद्धये ।
अल्लादेवं प्रभुं येशुं झरतुष्ट्रं नमाम्यहम् ॥ ५ ॥

## अशोकराजचिन्हवन्दनम् ।

उच्चैर्वदति पुण्यात्मा एच्. जी. वेल्सो महामुनिः ।
तारागणे यथा चन्द्रस्तथाशोको नृपेषु च ॥ ६ ॥
तस्माच्च तं बुद्धशिष्यं सर्वभूतहिते रतम् ।
अशोकं तं नृपश्रेष्ठं माङ्गल्यार्थं नमाम्यहम् ॥ ७ ॥
चतुर्दशशिलालेखा अशोकस्य च भूतले ।
तेष्वेवास्ति प्रजाधर्मो लोककल्याणकारकः ॥ ८ ॥

# महाराष्ट्रवन्दन

## ( मराठी पद्यानुवाद )

### भारतवंदन

भारताचा जय असो जोंवरी चंद्रसूर्य हे ।
शुभश्रेष्ठा भारतासी मांगल्यार्थ नमूं सदा ॥ १ ॥

### महाराष्ट्रवंदन

असो जय महाराष्ट्रा जोंवरी चंद्रसूर्य हे ।
शुभश्रेष्ठा महाराष्ट्रा मांगल्यार्थ नमूं सदा ॥ २ ॥

### देववंदन

या महाराष्ट्राज्याच्या मांगल्याकारणें सदा ।
विघ्नहारी ऋद्धिसिद्धिगणेशा नमुं सर्वदा ॥ ३ ॥
या महाराष्ट्र राज्याच्या मांगल्याकारणें सदा ।
महावीरास बुद्धास नानका नमुं सर्वदा ॥ ४ ॥
महाराष्ट्र राज्याच्या मांगल्याकारणें सदा ।
ल्लासि येशुख्रिस्तासि झरतुष्ट्रा नमूं सदा ॥ ५ ॥

REFBK-0013476
REFBK-0013476

### अशोकराजचिन्हवंदन

पुण्यात्मा एच्. जी. वेल्स तो सांगतो गर्जुनी पहा ।
नक्षत्रांत जसा चंद्र नृपामाजीं अशोक हा ॥ ६ ॥
सर्वभूतहितार्थी बुद्धशिष्योत्तमा प्रति ।
नृपश्रेष्ठा अशोकासी मांगल्याकारणें नमूं ॥ ७ ॥
चतुर्दश शिलालेख करिती धन्य भूतला ।
तयामाजीं प्रजाधर्म लोककल्याणकारक ॥ ८ ॥

अशोकस्य राजचिन्हे स्थिताः सिंहाश्च सर्वदा ।
गर्जन्ति ते मानवतां स्वात्मौपम्यं स्वरूपतः ॥ ९ ॥
अशोकचिन्हं तस्माच्च भारतेन शुभं धृतम् ।
अशोकचक्रं तं नौमि माङ्गल्यार्थं च सिद्धये ॥१०॥

**शिवभूपवन्दनम् ।**

महर्षिकल्पं राजर्षिं महाराष्ट्रस्य भूषणम् ।
महादर्शं शिवं भूपं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ ११ ॥

**टिळकवन्दनम् ।**

स्वराज्यं मम धर्मोऽस्तु सर्वजन्मनि जन्मनि ।
इमं सुमन्त्रं गायन्तं टिळकं प्रणमाम्यहम् ॥ १२ ॥

**गान्धीवन्दनम् ।**

श्रीकरमचन्दसुतं मोहनं लोकनायकम् ।
राष्ट्रस्य पितरं गान्धीं माङ्गल्यार्थं नमाम्यहम् ॥ १३ ॥

**राष्ट्राध्यक्षवन्दनम ।**

गुणज्ञं च शुभाचारं नीतिशास्त्रविशारदम् ।
राष्ट्राध्यक्षं महाश्रेष्ठं राजेन्द्रं तं नमाम्यहम् ॥ १४ ॥

**उपराष्ट्राध्यक्षवन्दनम् ।**

तत्त्वज्ञानमहामूर्तिं सर्वराष्ट्रेषु विश्रुतम् ।
उपाध्यक्षं महाश्रेष्ठं राधाकृष्णं नमाम्यहम् ॥ १५ ॥

**भारतमुख्यमन्त्रिवन्दनम ।**

लोकप्रियं लोकभक्तं गुणश्रेष्ठं महामतिम् ।
पण्डितं नेहरुं श्रेष्ठं नौमि वन्द्यं जवाहरम् ॥ १६ ॥

**महाराष्ट्रराज्यपालवन्दनम ।**

प्रकाशते राष्ट्रभक्त्या ज्ञानभक्त्या च सर्वदा
राज्यपालं श्रीप्रकाशं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ १७ ॥

अशोकाच्या राजचिन्हीं करिती सिंह गर्जना ।
पाळा मानवता धर्म सदा कल्याणकारक ॥ ९ ॥
राजचिन्ह अशोकाचें म्हणुनी घेइ भारत ।
श्रेष्ठा अशोकचक्रा त्या मांगल्याकारणें नमूं ॥ १० ॥

### शिवभूपवंदन

महर्षिकल्प राजर्षि महाराष्ट्रविभूषण ।
महादर्श शिवाजीस मांगल्यार्थ नमूं सदा ॥ ११ ॥

### टिळकवंदन

स्वराज्य हा असो धर्म जन्म जन्मांतरीं मम ।
गाणाऱ्या ह्या सुमंत्राला टिळकासीं नमूं सदा ॥ १२ ॥

### गांधीवंदन

कर्मचंद सुपुत्रासी लोकांच्या नायकासि त्या ।
नमूं या गांधीदेवासी राष्ट्रतातासि या सदा ॥ १३ ॥

### राष्ट्राध्यक्षवंदन

शुभाचारा गुणज्ञासी नीतिशास्त्रविशारदा ।
राष्ट्राध्यक्षा महाश्रेष्ठा राजेंद्रा त्या नमूं सदा ॥ १४ ॥

### उपराष्ट्राध्यक्षवंदन

तत्त्वज्ञानमहामूर्ति सर्व राष्ट्रांत विश्रुत ।
उपाध्यक्षा नमूं वंद्या राधाकृष्णासि सर्वदा ॥ १५ ॥

### भारत मुख्यमंत्रीवंदन

लोकप्रिय प्रजाभक्त गुणश्रेष्ठ महामती ।
जवाहरमहाभागा नेहरूस नमूं सदा ॥ १६ ॥

### महाराष्ट्रराज्यपालवंदन

जो राष्ट्रज्ञान भक्तीच्या प्रकाशें शोभतो मुदा ।
राज्यपाला श्रीप्रकाशा मांगल्यार्थ नमूं सदा ॥ १७ ॥

### महाराष्ट्रमुख्यमन्त्रिवन्दनम् ।

पुण्याल्लब्धं महाराष्ट्रं रक्षितुं कृतनिश्चयम् ।
वन्देऽहं मन्त्रिणं मुख्यं यशवन्तं महामतिम् ॥ १८ ॥

### महाराष्ट्रियराज्यपालवन्दनम् ।

नमामि पाटसकरराष्ट्रभक्तं परोपकारेण यशः सुरक्षितम् ।
मध्यप्रदेशस्य च राज्यपालं गुणानुरक्तं विबुधं शुभं सदा ॥१९॥
पंजाबस्य राज्यपालं राज्यशास्त्रविशारदम् ।
मनीषिणं गाडगीळं माङ्गल्यार्थं नमाम्यहम् ॥ २० ॥
ओरिसा राज्यपालं तं विद्वांसं गुणिनं शुभम् ।
सुखटणकरमहं वन्दे शुद्धबुद्धिं महामतिम् ॥ २१ ॥

### लोकमान्यटिळकस्तोत्रम् ।

स्वदेशी च बहिष्कारः शिक्षणं राष्ट्रियं सदा ।
स्वराज्यं यस्य चत्वारि सन्ति तत्त्वानि भारते ॥ २२ ॥
अभारतीयवस्तूनां बहिष्कारश्च सर्वदा ।
स्वदेशोद्भववस्तूनां स्वीकारो यस्य मङ्गलम् ॥ २३ ॥
राष्ट्राभिमानः शीलं च गुरुसेवा च सर्वदा ।
मातापित्रोः सदा भक्तिः एतद्राष्ट्रियशिक्षणम् ॥ २४ ॥
स्वराज्यं च सुराज्यं च सर्वदा सुखदायकम् ।
इमं सुमन्त्रं गायन्तं टिळकं नौमि सर्वदा ॥ २५ ॥

### महात्मा-गान्धी-स्तोत्रम् ।

त्यागमूर्तिं श्रेष्ठतमं शुद्धाचारं महामतिम् ।
राष्ट्रस्य पितरं गान्धीं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ २६ ॥

## महाराष्ट्र मुख्यमंत्रिवंदन

पुण्यलब्ध महाराष्ट्ररक्षणा दक्ष जो सदा ।
सच्चिवेशा यशोवंता मांगल्यार्थ नमूं सदा ॥ १८ ॥

## महाराष्ट्रराज्यपालवंदन

गुणज्ञराष्ट्रसद्भक्ता मध्यदेशप्रशासका ।
पाटसकरासि नमुं मांगल्याकारणें सदा ॥ १९ ॥
विद्वान्मूर्ति सद्भक्ता राज्यशास्त्रविशारदा ।
पंजाब राज्यपालासि गाडगिळासि नमूं सदा ॥ २० ॥
ओरिसाच्या राज्यपाला गुणज्ञा त्रिदुषा शुभा ।
सुखटणकरासि नमुं मांगल्याकारणें सदा ॥ २१ ॥

## लोकमान्य टिळक स्तोत्र

स्वदेशी व बहिष्कार, तसें राष्ट्रीय शिक्षण ।
स्वराज्यप्राप्ति हीं ज्याचीं चार तत्त्वें जगीं शुभ ॥२२॥
भारतीय न ज्या वस्तु बहिष्कार तयांवरी ।
स्वदेशोद्भववस्तूंचा मुदें स्वीकार जो करी ॥२३॥
राष्ट्राभिमान सच्छील गुरुसेवा निरंतर ।
मातृपितृपदीं भक्ती हेंचि राष्ट्रीय शिक्षण ॥२४॥
स्वराज्य जे सुराज्याख्य सर्वदा सुखदायक ।
गाणाऱ्या ह्या सुमंत्राला टिळकां त्या नमूं सदा ॥२५॥

## महात्मा गांधी स्तोत्र

त्यागमूर्ति गुणज्येष्ठ शुद्धाचार महामति ।
पिता जो सर्व राष्ट्राचा नमूं त्या गांधिना सदा ॥२६॥

स्वातन्त्र्यार्थे कृताचारं सदा राष्ट्रहिते रतम् ।
राष्ट्रस्य पितरं गान्धीं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ २७ ॥

गीतापाठेन कृष्णस्य वरं प्राप्तं महामुनिम् ।
राष्ट्रस्य पितरं गान्धीं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ २८ ॥

सदा शान्तं सदा शुद्धमहिंसाव्रतधारिणम् ।
राष्ट्रस्य पितरं गान्धीं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥ २९ ॥

## नेहरूवन्दनम् ।

**जयतु जयतु नेता भारतस्य प्रियो यः ।**
**जयतु जयतु शिष्यो गान्धिदेवस्य मुख्यः ॥**
**जयतु जयतु तातो बालकानां स आत्मा ।**
**जयतु जयतु नेहरू पण्डितो राष्ट्रभक्तः ॥३०॥**
**जगद्वन्द्यं शान्तिदूतं ज्ञानसिन्धुं सदा शुचिम् ।**
**जवाहरं नेहरूदेवं नौमि माङ्गल्यसिद्धये॥ ३१ ॥**

## राज्यपाल–श्रीप्रकाशस्तोत्रम् ।

( महाराष्ट्रराज्य–राज्यपालः )

श्रीप्रकाशस्य पितरं काशीक्षेत्रनिवासिनम् ।
बाबुभगवानदासं श्रेष्ठं वन्दे महामुनिम् ॥३२॥

बॅरिस्टरेति पदवीं धारयन्तं महामतिम् ।
राज्यपालं श्रीप्रकाशं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥३३॥

नीतिचातुर्यमाधुर्यशीलाचारगुणान्वितम् ।
राज्यपालं श्रीप्रकाशं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥३४॥

स्वकर्मनिरतं शुद्धं कृतज्ञं लोकनायकम् ।
राज्यपालं श्रीप्रकाशं नौमि माङ्गल्यसिद्धये ॥३५॥

स्वातंत्र्यार्थ कृती केली रमला राष्ट्ररक्षणीं ।
पिता जो सर्व राष्ट्राचा नमूं त्या गांधिना सदा ॥२७॥

गीतेच्या पठणें ज्यातें कृष्णाचा लाभला वर ।
पिता जो सर्व राष्ट्राचा नमूं त्या गांधिना सदा ॥२८॥

शांतियुक्ता सदा शुद्धा अहिंसाव्रतपालका ।
पिता जो सर्व राष्ट्राचा नमूं त्या गांधिना सदा ॥२९॥

ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम ...३६५४८.०..... वि:
क्रमांक ...१६११...... नों:

### नेहरूवंदन.

असो जय भारताच्या नेत्याचा या जगीं सदा ।
गांधींच्या मुख्य शिष्याचा असो जय जगीं सदा ॥

असो जय बालकांच्या ताताचा या जगीं सदा ।
असो जय पंडिताचा नेहरूंचा जगीं सदा ॥३०॥

शांतिदूता जगद्वंद्या, ज्ञानसिंधू सदा शुचि ।
जवाहर नेहरूच्या चरणा नमुं या शुभा ॥३१॥

### महाराष्ट्र राज्यपाल श्रीप्रकाशस्तोत्र

काशीक्षेत्रनिवासी त्या श्रीप्रकाशपित्या शुभा ।
त्या बाबू भगवानासि नमूं मांगल्यकारणें ॥३२॥

बॅरिस्टर उपाधीनें शोभतो जो महामती ।
राज्यपाल श्रीप्रकाशा मांगल्यार्थ नमूं सदा ॥३३॥

नीति चातुर्य माधुर्य शीलाचार गुणान्वित ।
राज्यपाल श्रीप्रकाशा मांगल्यार्थ नमूं सदा ॥३४॥

स्वकर्मनिरता शुद्धा, कृतज्ञा लोकनायका ।
श्रीप्रकाशा राज्यपाला, मांगल्यार्थ नमूं सदा ॥३५॥

## यशवन्तस्तोत्रम् ।

वेलाप्रियं राष्ट्रभक्तं गान्धीशिष्यं महामतिम् ।
चव्हाणकुलसम्भूतं यशवन्तं नमाम्यहम् ॥ ३६ ॥
कलाप्रियं दीनभक्तं शुद्धाचारं च वत्सलम् ।
चव्हाणकुलसम्भूतं यशवन्तं नमाम्यहम् ॥ ३७ ॥
जातिभेदं महापापं वर्धमानमहर्निशम् ।
दूरीकर्तुं यतमानं यशवन्तं नमाम्यहम् ॥ ३८ ॥
वाण्यां कृतौ सदा चित्ते ऐक्यं यस्य प्रकाशते ।
आदर्शमन्त्रिणं श्रेष्ठं यशवन्तं नमाम्यहम् ॥ ३९ ॥

## वन्दनफलम् ।

अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।
चत्त्वारि संप्रवर्धन्ते कीर्तिरायुर्यशो बलम् ॥ ४० ॥ महाभारतम् ।
वन्दनान्मङ्गलावाप्तिः पुण्योत्पात्तिश्च सर्वदा ।
वैषम्यबुद्धिनाशश्च जायते नात्र संशयः ॥ ४१ ॥
तस्मात्प्रतिदिनं पाठं वन्दनस्यास्य सर्वदा ।
यः कुर्यात्स महाराष्ट्रे महत्त्वं प्राप्नुयाद् ध्रुवम् ॥ ४२ ॥

REFBK-0013476
REFBK-0013476

## यशवंतराव स्तोत्र

दिलेल्या समया पाळी गांधीशिष्य महामती ।
चव्हाणकुलसंभूता मांगल्यार्थ नमूं सदा ॥३६॥
कळाप्रिया दीननाथा शुद्धाचारदयान्विता ।
चव्हाणकुलसंभूता मांगल्यार्थ नमूं सदा ॥३७॥
चाढले जातिभेदाचे जें महापाप संतत ।
त्यातें संहारि जो यत्नें तयासी नमूं सर्वदा ॥३८॥
जें चित्तीं तेंचि जो बोले बोले तैसाचि वागतो ।
आदर्श मुख्यमंत्र्यासि मांगल्यार्थ नमूं सर्वदा ॥३९॥

## वंदनफल

वृद्धांची जो करी सेवा नित्य वंदी तयांप्रती ।
वाढती चार हो त्याची आयु शक्ती यशो मती ॥४०॥
वंदनें मंगलावाप्ति सुकृतोत्पत्ति सर्वदा ।
वैषम्यबुद्धि नासोनि लाभेल सुखसंपदा ॥४१॥
वंदनस्तोत्रपाठा या रोजच्या रोज जो करी ।
महाराष्ट्रीं उच्चपदीं बसवील तया हरी ॥४२॥

९३८६६

( सर्व हक्क प्रकाशकाधीन )

हें पुस्तक डबल डेमी, ३६ पौंडी हिंदुस्तानांत तयार झालेल्या व्हाइट प्रिंटिंग कागदावर छापलें आहे.

## शुभाशीर्वादः ।

[ १ ] महाराष्ट्रवन्दनं सर्वेषां कल्याणाय भवतु ।

भारतरत्न, महर्षि डॉ. धों. के. कर्वे, हिंगणे. २५ मे १९६०

---

## शुभसन्देशः ।

[ २ ] प्राच्यभाषापण्डितेन तुंगारेण च धीमता ।
कृतं मे रोचते नित्यं महाराष्ट्रस्य वन्दनम् ॥

यशवंतराव चव्हाण, मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई. २२-४-६०

---

[ ३ ] महाराष्ट्रवंदनांतील काव्यरचना प्रासादिक असल्यानें ती निश्चित परिणामकारक ठरेल, असा मला पूर्ण विश्वास आहे. मी काव्यास सुयश चिंतितों.

वि. स. पागे, अध्यक्ष, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई. १५-१०-६०

---

[ ४ ] महाराष्ट्रवंदनम् या काव्याची रचना सुबोध आहे. मी काव्य सेवेला सुयश चिंतितों

न्यायमूर्ति, ग. ब. बडकस, उपकुलगुरु, नागपूर विद्यापीठ, नागपूर १-१०-६०

---

[ ५ ] " संस्कृत महाराष्ट्रवन्दनम् " मिळालें. त्यास मी सुयश चिंतितों.

उपकुलगुरु, प्रिं द. गो. कर्वे, पुणें विद्यापीठ पुणें. २५ जुलै १९६०

---

[ ६ ] महाराष्ट्रस्य वृद्धयर्थं सर्वेषां सुखवर्धनम् ।
स्तोत्रं कृतं श्रुतं चित्तं महानन्दपरं हि तत् ॥

महामहोपाध्याय, प्रा. दत्तो वामन पोतदार, पुणें.

---

[ ७ ] तुंगारेण कृतं भक्त्या महाराष्ट्रस्य वन्दनम् ।
कथयामो वयं सर्वे काव्यमेतच्च सुन्दरम् ॥


( १ ) महामहोपाध्याय, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पुणें. ( २ ) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई. ( ३ ) डॉ. रा. ना. दांडेकर, पुणें विद्यापीठ. ( ४ ) प्रि. श्री. शं. नतके, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अध्यापक संघ. ( ५ ) प्रा. ह. दा. वेलणकर, मुंबई. ( ६ ) प्रि. डॉ. सौ. शरयू बाळ, पुणें. ( ७ ) पं. रा. नी. कवीश्वर, वैद्यभूषण, पुणें. ( ८ ) सर डॉ. भवानीशंकर नियोगी, नागपूर. ( ९ ) राजकवि, यशवंत दि. पेंढरकर.

---


[ ८ ] जैनवैदिकबौद्धानां शास्त्रज्ञो यश्च विश्रुतः ।
तुङ्गारोऽयं लिखितवानुत्तमं राष्ट्रवन्दनम् ॥

( १ ) महामहोपाध्याय, यज्ञेश्वरशास्त्री माधव कस्तुरे. ( २ ) पं. बालकृष्ण राघवेंद्र जोशी. ( ३ ) वैद्य गोपाल शंकर जोशी, कार्यवाह, महाराष्ट्र प्रांतिक संस्कृत परिषद, नांदेड, १३ मे १९६०

---



डॉ. राजेंद्रप्रसाद



डॉ. राधाकृष्णन्



श्री. श्रीप्रकाश



ना. चव्हाण